दै. बीड
# सुपरफास्ट
www.beedsuperfast.com
• संपादक : अतुल शंकरराव जाधव •

बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ | अंक २७८ | शनिवार दि. ११ ऑक्टोबर, २०२५ | RNI : MAHMAR/2023/84694 | पाने ४ | किंमत ४ रु.

BEED (Maharashtra) | Year-3 | Issue-278 | Saturday 11 October, 2025 | RNI : MAHMAR/2023/84694 | Pages 4 | Price 4



बीड – विश्व मानवाधिकार परिषदच्या वतीने बीड जिल्हाचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांचा भारत गौरव – २०२५ पुरस्कार प्रदान करताना विश्व मानवाधिकार परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष हाजी सय्यद लायक सहाब, मराठवाडा अध्यक्ष अँड. सय्यद साजेद, व ईतर..

# प्रधानमंत्री, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत येणाऱ्या रस्त्यांसह पुलांची दुरुस्ती करणार

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची अधिकाऱ्यांसोबत चर्चा
## चौसाळा ते वाढवणा रस्त्यावर दोन पूल होणार



**बीड । प्रतिनिधी**

दि.१० : बीड व शिरूर कासार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक रस्त्यांसह पुलांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांसोबत बीडमध्ये गुरुवारी (दि.९) चर्चा करण्यात आली. यावेळी विभाग अंतर्गत येणाऱ्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दि.२५ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून चौसाळा परिसरातील पुलांच्या दुरुस्तीबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आढावा घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील यांना परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सादर करण्यास सांगितले. या प्रस्तावात चौसाळा-पिंपळगाव घाट-वाढवणा रस्ता (इजिमा-४८) येथील दोन नवीन पुलांच्या बांधकामाचाही समावेश करण्यात आला आहे. तसेच, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्ते व पुलांच्या तातडीच्या देखभाल आणि दुरुस्तीबाबत बैठकीत सूचना देण्यात आल्या. या बैठकीत प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील, उपअभियंते पी.बी. जोगदंड, एच.डी. शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत बीड विधानसभा मतदारसंघातील एनएच-५६१ ते एसएच-५९ -नवगण राजुरी ते सोनगाव रोड, एमआरएल-१३ - नाळवंडी ते ढेकणमोहा, व्हीआर-१२ -लक्ष्मीआई » पान २ वर

### देखभाल निकषामध्ये न बसणाऱ्या रस्त्यांसाठी निधी मागणीचा प्रस्ताव

**प्रलंबित कामांना गती देण्यासाठी तसेच देखभाल निकषात न बसणाऱ्या रस्त्यांसाठी शासनाकडे निधीसाठीचा प्रस्ताव देण्याच्या सूचना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिल्या. त्याअनुषंगाने अधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरू केली आहे.**

## आदित्य दंत महाविद्यालय, बीडचा विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये ठसा
### चार खेळाडूंची आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी निवड




**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), नाशिक यांच्यावतीने जालना येथील क्रीडा संकुलात ३ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये आदित्य दंत महाविद्यालय, बीडने उल्लेखनीय कामगिरी करत आपली ओळख ठळकपणे अधोरेखित केली. महाविद्यालयाचे २१ विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झाले होते, यापैकी चार खेळाडूंनी आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी पात्रता मिळवली आहे. यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करत त्यांच्या उत्कृष्ट खेळाडू वृत्तीला दाद दिली. सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हे यश केवळ महाविद्यालयासाठी नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाचे आहे. महाविद्यालयाच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेत दुसरे स्थान पटकावले.

**विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळाच्या मैदानातही गुणवत्ता सिद्ध केली : आदिती सारडा**

**आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना भविष्यात अशा स्पर्धांमध्ये अधिक संधी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता खेळाच्या मैदानातही आपली गुणवत्ता सिद्ध केल्याचे त्या म्हणाल्या. हा आत्मविश्वास त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाच्या या यशाने संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना निर्माण झाली असून विद्यार्थ्यांचे हे यश भविष्यातील अनेक युवा खेळाडूंना प्रेरणादायी ठरणार असल्याचेही त्या म्हणाल्या.**

## महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी, कृती समितीचा विविध मागण्यासाठी संप




**बीड । प्रतिनिधी**

वीज कर्मचारी, अधिकाऱ्यांचा महावितरण कंपनीत होत असलेल्या खाजगीकरणाला व आदी बाबींना विरोध आहे. यामुळे मुख्य सचिव यांच्याशी चर्चा करण्यात आली पण त्यावेळी चर्चेत नसल्याले मुद्दे समोर आल्याने महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी, कृती समितीने संप सुरू केला आहे. हा संप ७२ तास सुरू असणार आहे.

दि. ६ रोजी अप्पर मुख्य सचीव उर्जा व अध्यक्ष महावितरण यांच्या उपस्थितीत ७ संघटनांसोबत झालेल्या वाटाघाटीचा गोषवारा पत्र क्र. औ.सं.वि/अ/३२६३१ दि.७.१०.२५ नुसार प्राप्त झाला. सदर वाटाघाटीत अप्पर मुख्य सचीव उर्जा व महावितरणचे अध्यक्ष यांनी व्यवस्थापणातर्फे ज्या बाबी मान्य केल्या त्याच्या विपरित स्पष्टीकरण घोषणापत्रात आहे. वाटाघाटीत जी स्पष्टता कृती समितीष्या

७ संघटनांना ७ ही प्रश्नाबाबत अप्पर मुख्य सचीव उर्जा व महावितरणचे अध्यक्ष यांनी दिली. त्याचा गोषवाऱ्यात उल्लेख नसल्याने आपण पाठवलेल्या पत्रातील स्पष्टीकरण आम्हाला मान्य नाही. ७२ तासाचा संप होऊ नये म्हणून वाटाघाटी चर्चा झाली. त्या बाबतीत स्पष्टता नसल्याने आम्ही हा संप सुरू केला आहे. जे मुद्दे वाटाघाटीत मान्य केले त्याचा गोषवाऱ्यात अभाव असल्याने कृती समिती समोर संप करण्याशिवाय पर्याय उरला नाही. अजूनही वेळ गेलेली नाही याचा व्यवस्थापणाने विचार करावा असे » पान २ वर

## मच्छिमार बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान : भिमा गहीरे



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवा प्रमाणे च मच्छीमार बांधवांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सन २०२५ या पावसाळी हंगामात माहे सप्टेंबर महिन्यात जिल्हा वर झालेल्या नैसर्गिक अतिवृष्टीमुळे सर्वत्र पूरस्थिती मच्छीमार बांधवांचे खूप मोठ्या प्रमाणात नदीकाठचे नुकसान झाले आहे , यामध्ये तलावात मच्छी बीज साठवणूक केलेली असेल. त्यांचे जाळे असतील. त्यांची होडी असतील व त्यांचे संसार उपयोगी वस्तू असतील तलावा किनारी गोदावरी नदी किनारी असेल. हे सर्व अतिवृष्टी मध्ये पाण्याच्या प्रवाहामध्ये सर्व वाहून गेले .यामुळे मच्छीमार बांधवांवर उपासमारीची वेळ आली आहे . युवाशक्ती मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्यादित देवगाव या संस्थेच्या मार्फत पाठपुरावा केल्यानंतर दि ६/१०/२०२५ रोजी मत्स्य विभागामार्फत डॉ भूषण साहेब व अजय मिश्रे साहेब यांनी येऊन अतिवृष्टी मुळे झालेल्या मच्छीमारांचे बांधवांचे नुकसानाचे पंचनामे करण्यात आले .यावेळी उपस्थित संस्थेचे सभासद व पदाधिकारी व मच्छीमार बांधव उपस्थित होते, यावेळी तात्काळ मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी भोई समाजाचे जिल्ह्याचे नेते भीमा गहीरे यांनी प्रशासनाकडे केले आहे.

## मोडी लिपी प्रशिक्षणात धनराज इंगोले यांची चमकादार कामगिरी



**आडस । प्रतिनिधी**

येथील शिक्षक धनराज दत्तात्रय इंगोले यांनी पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासनाच्या वतीने नांदेड येथे आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण व त्यानंतर झालेल्या परीक्षेत ७१ गुण मिळवून ७६ विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक पटकावून चमकदार कामगिरी केली. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने नांदेड येथे यशवंत महाविद्यालयात दि. १८/०९/२०२५ ते २७/०९/२०२५ या कालावधीत मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. यामध्ये एकूण ७६ विद्यार्थी सहभागी झाले होते. ६७ विद्यार्थी उपस्थित राहिले तर ९ अनुपस्थितीत राहिले होते. या प्रशिक्षण वर्गानंतर घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल बुधवारी दि. ८ घोषित करण्यात आला. यामध्ये आडस (ता. केज ) येथील रहिवासी शिक्षक धनराज दत्तात्रय इंगोले यांनी सर्वाधिक ७१ गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे. मोडी लिपीचे इतिहास आणि संस्कृती जपण्यामध्ये मोठे योगदान आहे. तसेच अनेक ऐतिहासिक पुरावे ही मोडी लिपी मध्ये असल्याने अनेक वेळा मोडी लिपी येणाऱ्यांना शोधत फिरावे लागत असे परंतु आता आडस (ता. केज ) येथेच मोडी लिपी तज्ञ उपलब्ध असल्याने परिसरातील अनेकांची सोय होणार आहे. धनराज इंगोले यांच्या या यशामुळे आडस गावाची मान उंचावली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, त्यांचे मित्र, परिवार आदिंकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जातीत एससी समाविष्ट करण्याची मागणी
### बीड जिल्हा धोबी-परीट समाजातर्फे मुख्यमंत्र्यांना निवेदन; दादासाहेब नन्नवरे यांचे मार्गदर्शन



**बीड । प्रतिनिधी**

धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती (Scheduled Caste - SC) प्रवर्गाचे आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी बीड जिल्हा धोबी-परीट समाजाने आज, जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले. हे निवेदन दादासाहेब नन्नवरे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. या मागणीच्या समर्थनार्थ समाजाच्या शिष्टमंडळाने महत्त्वाचे ऐतिहासिक आणि संवैधानिक पुरावे सादर केले. प्रमुख मागणी आणि ऐतिहासिक संदर्भ समाजाने निवेदनात म्हटले आहे की, १९६० पूर्वी (महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या आधी) धोबी-परीट समाज सी.पी. अँड बेरार राज्यामध्ये बुलढाणा व भंडारा जिल्ह्यांमध्ये राज्य आणि केंद्र सरकारच्या गॅझेटमध्ये अनुसूचित जातीत समाविष्ट होता, हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. मात्र, १९६० मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर या समाजाला इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गात टाकण्यात आले. विशेष म्हणजे, हा बदल करताना शासनाकडे कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही, हे तत्कालीन समाजकल्याण मंत्र्यांनी मान्य केल्याचेही निवेदनात नमूद आहे.

१९७६ च्या घटनादुरुस्तीचा आधार समाजाची ही कोणतीही 'नवीन' मागणी नसून, 'पूर्ववत अनुसूचित जातीत समाविष्ट' करण्याची आहे. त्यांनी १९७६ च्या घटनादुरुस्तीचा संदर्भ दिला आहे, ज्यानुसार 'क्षेत्रबंधन' हटविल्यामुळे एका जिल्ह्याला मिळत असलेली सवलत संपूर्ण राज्याला लागू होते. जर समाज आज भंडारा किंवा बुलढाणा जिल्ह्यांमध्ये असता, तर संपूर्ण राज्यात तो अनुसूचित जातीत राहिला असता. शासनाने ही चूक त्याच वेळी दुरुस्त करायला हवी होती, त्यामुळे समाजावर मोठा अन्याय झाल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. समितींचे अहवाल आणि मुख्यमंत्र्यांची शिफारस महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या डॉ. भांडे समिती, टाटा संशोधन समिती, अनुसूचित जाती-जमाती आयोग, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन समिती (B-RTI) या सर्व संस्थांनी धोबी-परीट समाज सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून, तो अस्पृश्यतेचे निकष पूर्ण करतो, असा स्पष्ट अहवाल दिला आहे. या सर्व संस्थांनी धोबी समाजाला अनुसूचित जातीत समाविष्ट करण्याची स्पष्ट शिफारस केली आहे. या शिफारशींच्या आधारावरच, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी २०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाला धोबी समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्याची स्पष्ट शिफारस केली आहे. तातडीची मागणी या केंद्र शासनाच्या पाठपुराव्यासोबतच, महाराष्ट्र शासनाने १९६० चे पुरावे आणि डॉ. भांडे समितीच्या शिफारशी विचारात घेऊन, सर्वप्रथम भंडारा व बुलढाणा जिल्ह्यात पूर्ववत समाविष्ट करावे, जेणेकरून १९७६ च्या घटनादुरुस्तीनुसार संपूर्ण राज्यातील धोबी समाज आपोआप अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट होईल, अशी तातडीची मागणी बीड जिल्हा धोबी-परीट समाजाने केली आहे. उपस्थिती यावेळी बालाजी पवार, प्रधान पवार, मोहन राऊत, शंकर व्यवहारे, गणेश नन्नवरे, कान्हा मुळे, सतिष मुळे, बाबू भालेकर, महादेव नन्नवरे, विक्रम वाघमारे, श्रीकांत जाधव, मुळे मामा, दत्ता जाधव, आकाश जाधव, शहादेव नन्नवरे, विलास जाधव, अर्जून काळे, नारायण काळे, परमेश्वर राऊत, आदित्य रोकडे, दत्ता नन्नवरे, सोमनाथ नन्नवरे, रामेश्वर काळे, पमा काळे, कचरु राऊत, शैलेश मुळे, रदिप वाघमारे, नितीन नन्नवरे, ज्ञानेश्वर राऊत, राजेंद्र मोताळे, किरण राऊत, अमोल पवार, बंडू राऊत, राऊत पाहुणे इत्यादी समाज बांधवांनी उपस्थित राहून निवेदनावर सह्या केल्या.

## कबड्डी हा महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा खेळ : दिपक आतकरे
### शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे शानदार उदघाटन



**गेवराई । प्रतिनिधी**

कब्बडी हा महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा खेळ आहे, तो आजच्या युवकांनी जोपासला पाहिजे. कबड्डी हा खेळ आपल्याला जय पराजय पचवायला शिकवतो. त्यामुळे युवकांनी खेळाकडे वळावे असे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक आतकरे यांनी केले. गेवराई येथे शिक्षणमहर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा कबड्डी असोशिएशन व शारदा स्पोर्ट्स कडमी गेवराई आयोजित आयोजित जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. शिक्षणमहर्षी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा कबड्डी असोशिएशन व शारदा स्पोर्ट्स कडमी गेवराई आयोजित आयोजित जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचा शुभारंभ झाला. यावेळी दादासाहेब घोडके, विनोद सौदरमल, भाष्करराव काकडे, राष्ट्रीय खेळाडू गोपाळ मोटे, सतिश प्रधान, दादासाहेब चौधरी, जिजा पंडित, लहू पवार, बीड जिल्हा कबड्डी असोशिएशनचे कार्यवाह प्राचार्य डॉ.विश्वास कदम आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी प्रस्ताविक केले. या निवडचाचणी स्पर्धेसाठी जिल्हा भरातुन किशोर गटातुन १६, किशोरी ६ ,कुमारी ६,ओपन महिला गटाचे २ अशा एकुण ३० संघाने सहभाग नोंदवला गेला. उदघाटक व प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून मैदान पुजन केले व उदघाटनपर सामना खेळवला गेला. निवड समिती तज्ञ व पंच म्हणुन प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे, प्रा.कैलास जगदाळे, प्रा.प्रविण शिलेदार. प्रा.सानप, प्रा.वनगुजरे आदिनी काम पाहिले. याप्रसंगी नितीन गर्जे, श्रीराम इंगळे , सुरेश चौधरी, श्रीमती सुनिता शिंदे यांच्यासह क्रिडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.कलदंर पठाण, प्रा.केशव सुर्वे, मधुकर धुताडमल यांनी अथक परिश्रम घेतले.

# हरितक्रांतीच्या काळ्या पाऊलखुणा

देश हरितक्रांतीमुळे आत्मनिर्भर झाला, पण पाठोपाठ अनेक समस्या निर्माण झाल्या. तांदूळ आणि गव्हासाठी रासायनिक खते व कीटकनाशकांचा अतिरेकी वापर, वीज–पाण्याची नासाडी, जनावरांसाठी चाऱ्याचा तुटवडा इत्यादी... या समस्यांची दखल ना राज्यकर्त्यांनी घेतली, ना कृषी वैज्ञानिकांनी. हरितक्रांतीमुळे धान्योत्पादनात वाढ जरूर झाली. परंतु, त्याचबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांची दखल ना राज्यकर्त्यांनी घेतली, ना कृषी वैज्ञानिकांनी घेतली. परिणामी कालौघात कृषी समस्या उग्र बनल्या. उदाहरणार्थ, तांदूळ आणि गहू यांच्या अधिक उत्पादक वाणांसाठी रासायनिक खतांचा वाढता वापर अनिवार्य ठरला. अशा खतांच्या उत्पादनासाठी खनिज द्रव्यांचा वापर होत असल्यामुळे १९७३ साली 'ओपेक' राष्ट्रांनी खनिज तेलाच्या किमती सुमारे चौपट केल्यावर स्वाभाविकपणे रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या. अशा परिस्थितीत धान्यांच्या उत्पादनखर्चात वाढ होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या नफ्यात घसरण होऊ नये या उदात्त हेतूने केंद्र सरकारने रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्या. या प्रक्रियेचा आर्थिक भार केंद्र सरकारला उचलावा लागतो. त्यासाठी आजच्या घडीला वार्षिक सुमारे २.५ लाख कोटी रुपयांचा भार केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडतो. रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्यामुळे युरिया या खताचा वापर औद्योगिक क्षेत्रातही होत असे. ही गळती थांबविण्यासाठी केंद्र सरकारने युरियाला कडुलिंबाचा लेप (उेरीं) देण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेमुळे युरियाचा औद्योगिक क्षेत्रातील वापर बंद झाला. परंतु भारतात रासायनिक खतांच्या किमती केंद्र सरकारने कृत्रिमरीत्या रोखून ठेवल्यामुळे अशी खते चोरट्या मार्गाने पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका अशा शेजारच्या देशांत निर्यात होऊ लागली. परिणामी अशा शेजारच्या देशांमधील शेतकऱ्यांना रासायनिक खते स्वस्तात मिळू लागली. हा अवैध व्यापार थांबविण्यास भारत सरकारला यश मिळाले नाही. हरितक्रांतीपूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी, बाजरी यांसारखी लक्षणीय प्रमाणात कमी पाणी लागणारी पिके घेतली जात होती. परंतु हरितक्रांतीनंतर भात, गहू अशी अधिक पाणी लागणारी पिके घेण्यास सुरुवात झाली. पंजाब, हरियाणा अशा राज्यांत भाताच्या पिकाला पुरेसा पाऊस पडत नाही. तरीही तेथील शेतकरी भाताचे पीक घेतात आणि त्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा करतात. पाण्याचा असा उपसा करण्यासाठी राज्य सरकारे शेतकऱ्यांना जवळपास फुकटात विजेचा पुरवठा करतात. तसेच केंद्र सरकार शेतकऱ्यांनी पिकविलेला तांदूळ निर्यात करण्याचे काम करते. अशा रीतीने एक प्रकारे पाण्याची तर निर्यात होतेच; पण त्याचबरोबर भूगर्भातील पाण्याचा उपसा करण्यासाठी खर्च होणारा विद्युत पुरवठा, तांदळाच्या उत्पादनासाठी लागणारी रासायनिक खते अशा उत्पादक घटकांवर होणाऱ्या सरकारच्या खर्चाचा भार अंतिमतः भारतामधील कर भरणाऱ्या लोकांना वाहावा लागतो आणि त्याचा लाभ विदेशातील ग्राहकांना होतो. या विसंगतीकडे भारतीय अर्थतज्ज्ञांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते.

हरितक्रांतीमुळे ज्वारी, बाजरी अशा खाद्यान्नाऐवजी तांदूळ व गहू अशा धान्यांच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचा अनिष्ट परिणाम लोकांच्या जीवनावर झाला. तसेच ज्वारी, बाजरीची धाटे हा गुरांसाठी पौष्टिक सुका चारा होता, तो पूर्णपणे बंद झाला. भाताचा पेंढा आणि गव्हाचे काड हा गुरांसाठी निरुपयोगी चारा असल्यामुळे पंजाब व हरियाणा या राज्यांतील शेतकरी असे पिकांचे अवशेष जाळून टाकतात. अशा प्रदूषणामुळे दिल्ली व त्याच्या आसपासच्या रहिवाशांना प्रदूषणाचा उपद्रव होतो आणि त्यांच्या आयुर्मानात घट होते. हरितक्रांतीमुळे पंजाब व हरियाणा या राज्यांत खरीप हंगामात भात आणि रब्बी हंगामात गहू अशी पिके घेतली जातात. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा खूपच कमी झाला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना घरगुती वापरासाठी चांगले पाणी मिळत नाही. तेथील नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या पाण्यात घातक क्षारांचे प्रमाण बेसुमार वाढल्याचा अनिष्ट परिणाम लोकांना भोगावा लागतो. या प्रक्रियेची टोकाची परिणती म्हणजे पंजाब राज्यातून दररोज रेल्वेची एक गाडी भरून कर्करोगग्रस्त नागरिक उपचारांसाठी इतर राज्यांची वाट धरतात. पंजाब व हरियाणा या राज्यांमधील शेतकऱ्यांनी खरीप आणि रब्बी हंगामात अनुक्रमे भात व गहू ही पिके घेण्याऐवजी सात महिन्यांनी काढणीसाठी तयार होणाऱ्या ज्वारीचा पेरा केला, तर पंजाब व हरियाणा या राज्यांमध्ये हरितक्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्या संपतील. ज्वारीचे सदर बियाणे 'इक्रिसॅट' या हैदराबादमधील संशोधन करणाऱ्या संस्थेकडे उपलब्ध आहे. सदर वाणाचे हेक्टरी उत्पादन १० टन एवढे प्रचंड आहे. त्यामुळे ग्राहकांना ज्वारी १५ रुपये किलो दराने मिळेल. ज्वारी अशी स्वस्तात मिळू लागली, की सरकारला सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गहू व तांदूळ अनुक्रमे २ व ३ रुपये किलो दराने वितरित करावे लागणार नाहीत. त्यामुळे सरकारचे वर्षाला सुमारे दोन लाख कोटी रुपये वाचतील. आजकाल बहुतांश शेतकरी त्यांच्या शेतात पिकलेले धान्य सरकारला किंवा व्यापाऱ्यांना किमान आधारभावाने विकतात आणि स्वतःच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी लागणारे धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दुकानातून खरेदी करतात. कारण खुल्या बाजारात ज्या धान्याचा भाव ३५ ते ४० रुपये आहे, ते धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ३ रुपये किलो दराने वितरित केले जात असे. आता मोदी सरकारने ते विनामूल्य वितरण करण्यास सुरुवात केली आहे. देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना उपजीविकेसाठी लागणारे धान्य स्वस्तात उपलब्ध करून देणे हे धोरण प्रशंसनीय असले तरी देशातील ६६ टक्के लोक आता दारिद्र्यरेषेखाली नाहीत. आजच्या घडीला दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी १२ टक्क्यांपेक्षा कमी आहे, असा निती आयोगाचा निष्कर्ष आहे. त्यामुळे सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर वर्षाला जे सुमारे दोन लाख कोटी रुपये खर्च करते, त्यातील सुमारे पाच ते सहा टक्के खर्च अनाठायी ठरतो. सरकारच्या या धोरणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळणारे शेतकरी आपल्या शेतात पिकलेले धान्य सरकारला वा खासगी व्यापाऱ्यांना विकतात आणि आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी लागणारे धान्य मिळविण्यासाठी रेशन दुकानापुढे उभे राहतात. ही आपल्या आर्थिक व्यवस्थेत निर्माण झालेली विकृती आहे. ज्या लोकांची आर्थिक स्थिती बरी आहे असे लोक रेशन घेण्यासाठी दुकानाकडे वळतही नाहीत. त्यांच्या वाट्याचे धान्य रेशन दुकानदार खुल्या बाजारात विकून भरपूर नफा कमावतात. म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे उद्दिष्टच साध्य होत नाही. त्यामुळे सरकारने आपल्या धोरणात मूलभूत बदल करणे गरजेचे ठरते. सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना धान्य वितरित करण्याऐवजी त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये अनुदानाची रक्कम जमा करावी. अशी रक्कम त्यांना धान्याची खरेदी करण्यासाठी वापरता येईल याची नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून खातरजमा करता येईल. असा बदल केला की सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अनागोंदी संपेल. अन्न महामंडळावरील कामाचा भार कमी होईल. भ्रष्टाचाराला आळा बसेल. १४२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात ८१ कोटी लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्याचे मोफत वाटप करण्याचे धोरण हे निखालस चुकीचे धोरण आहे. भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येत असताना देशातील ६६ टक्के लोकांना त्यांच्या निर्वाहासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर विसंबून राहावे लागत असेल, तर आपल्याला आर्थिक धोरणाच्या संदर्भात नव्याने विचार करायला हवा. प्रश्न आहे तो हे धोरण बदलणार कोण? 'रेवडी'च्या संदर्भात व्यासपीठावर टीका करणे सोपे आहे. परंतु, ती बंद करणे अवघड बाब ठरते, हेच खरे!

## रस्ता व नाली कामांच्या विलंबाबाबत एसडीपीआयचा शांततापूर्ण आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

वार्ड क्रमांक २१, सैयद अली नगर, तेलगाव रोड परिसरात अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या रस्ता व नाली कामांविषयी नागरिकांनी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (SDPI) च्या वतीने सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी नगर परिषद कार्यालयासमोर शांततापूर्ण धरना आंदोलन केले. या आंदोलनात स्थानिक नागरिकांसोबत मोठ्या संख्येने महिला, मुले तसेच SDPI चे पदाधिकारी सहभागी झाले. आंदोलनादरम्यान नागरिकांनी रस्ता आणि नालीचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. धरना आंदोलनात SDPI चे




कार्यकारिणी सदस्य कलीम इनामदार तसेच SDPI चे इतर पदाधिकारी, बीड शहर बचाव मंच चे पदाधिकारी नितीन जायभाये आणि नगरसेवक अशफाक इनामदार विशेष उपस्थित होते. आंदोलनाच्या शेवटी SDPI पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत चेतावणी दिली की, जर काम तातडीने सुरू झाले नाही, तर पुढील काळात मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येईल. SDPI पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. आता जनतेची मागणी आहे की काम तातडीने सुरू व्हावे. या प्रसंगी नागरिकांनी नगर परिषद प्रशासनास विनंती केली की रस्ता आणि नालीचे काम लगेच सुरू करण्यात यावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. या संदर्भात प्रतिलिपी पालकमंत्री अजित पवार, जिलाधिकारी बीड आणि मुख्य अधिकारी, नगर परिषद बीड यांनाही देण्यात आली आहे.

## आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयांमध्ये स्वच्छता पंधरवडा उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या कृषी व संलग्न महाविद्यालयांमध्ये दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता पंधरवडा हा महाविद्यालय परिसरात मध्ये मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी परिसर स्वच्छता, वृक्षलागवड, प्लास्टिकमुक्ती अभियान, निबंध व पोस्टर स्पर्धा, मार्गदर्शन व्याख्याने तसेच जनजागृती रॅली अशा विविध उपक्रमांत सहभाग नोंदवला. सदर उपक्रमाचा समारोप महात्मा गांधी जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाने करण्यात आला. यावेळी कृषि व कृषि सलंग्न महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रा. भुतडा एस. एच., मा. प्रा राठोड पी. एस., मा. प्रा सानप ए. यु. व मा. प्रा कचरे एस. एच. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गुजर जी.एम., प्रा. राउत ओ.एन., प्रा. पवार एस.डी. व प्रा. गव्हाणे डी. बी. व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गांधीजींच्या



जयंतीनिमित्त त्यांच्या स्वच्छता, सत्य आणि अहिंसेच्या विचारांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती घडवून आणण्याचा संकल्प व्यक्त केला. महाविद्यालय परिसरातील वसतिगृह, कॅन्टीन, मंदिर, पार्किंग, खेळाचे मैदान ई. परिसरात साफसफाई करून स्वच्छता पंधरवडा संपन्न करण्यात आला. या स्वच्छता पंधरवड्यामुळे विद्यार्थी व स्थानिक नागरिकांमध्ये पर्यावरण जागरूकता वाढीस लागली असून परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याचा संदेश समाजामध्ये पोहोचविण्यात यश आले.

पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### प्रधानमंत्री, मुख्यमंत्री ग्रामसडक...

तांडा, एमडीआर–३१ –बीडजवळ, आहेर धानोरा ते वरवटी, भाळवणी ते बेलेश्वर, एसएच–५५ – म्हाळसजवळा, राजापूर, वाकनाथ रोड, एसएच–५६ – म्हाळसापूर ते पिंपळगाव, राक्षसभुवन, कुक्कडगाव, एसएच–५६ –लिंबागणेश, काटवटवस्ती, अंजनवती, घारगाव, एनएच–२११ –मोरगाव ते देवऱ्याचावाडा, एमएसएच–१६ – ढेकणमोहा ते कारळवाडी, निर्मळवाडी, एनएच–२११ – कर्झनी (ब) ते कर्झनी (क), एसएच–६३ – आर्वी, तरडगव्हाण ते गाजीपूर रोड, गात शिरापूर, एसएसएच–१६ –ढेकणमोहा ते आंबेसावळी, मन्यारवाडी रोड, एसएच–५५ – उमरद (क) ते नागापुर बुद्रुक, ब्रन्हानपूर रोड, एसएच–६४ – देवीबाभुळगाव रोड, एमएसएच–१६ – काळेगाव हवेली रोड, एसएच–५५ – गंगनाथवाडी रोड, एमएसएच–१६ – काठोडा ते वांगी रोड, एसएच–५६ – मुळूकवाडी ते मसेवाडी रोड, ओडीआर–५० –नरनाळे ते डोईफोडेवस्ती रोड, एसएच–५५ –इट तांडा रोड, ओडीआर–११३ –मेंगडेवाडी रोड, ओडीआर–११३ – धुमाळवाडी रोड, ओडीआर–४८ – तेलपवस्ती ते मानेवाडी रोड, एमडीआर–१९ –रुपेवाडी रोड, ओडीआर–४७ – मांडवजाळी ते भाळवणी रोड, एसएच–२६ –खंडाळा ते ढाळेवस्ती रोड, एनएच–२११ –धनगरवाडी रोड, ओडीआर–११५ –फुकेवाडी रोड, वंजारवाडी ते भगवाननगर रोड, आहेर धानोरा ते राममंदिर इंगोळे पूर्व वरवटी रोड, एमएसएच–१६ –वंजारवाडी चऱ्हाटा रोड –तांदळवाडी ते सिसरटवस्ती, एसएच–२११ –कोळवाडी, एसएच–२११ –वानगाव पाईसावस्ती, बोरखेडवस्ती ते बोरखेड–गोलांग्री, एमडीआर–२८ –शाहाबाजपूर सानपवस्ती, एनएच–२११ –आहेरवडगाव ते काटवडा रोड, खांबालिंबा पौंडूळ ते नारायणगड, केतुरा रोड, एमडीआर–२८ –गाजीपूर, एमएसएच–१६ – मैंदा, एमडीआर–२८ –वासनवाडी ते लक्ष्मीनगर, एसएच–२३२ –परभणी ते केसापुरी, एमडीआर–३२ –बोरफडी ते मोहगीरवाडी, लक्ष्मीनगर, एमडीआर–१८ –चव्हाणवाडी, एमडीआर–१८ –खुंड्रस, ओडीआर–५१ –चांदेगाव, ओडीआर–५१ – जाधववस्ती, एसएच–५५ – खांडेपारगाव, एसएच–५५ – अंधरवनपिंप्री, एमडीआर–२८ –गाजीपूर ते शिरूर (कासार) या रस्त्यांसह पुलांची दुरुस्ती केली जाणार आहे. त्यामुळे अनेक गावांचा दळणवळणाचा मार्ग सुकर होणार आहे.

### सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश...

जीर्णावस्थेतील मूर्तीच्या जीर्णोद्धाराच्या याचिकेवरील १६ सप्टेंबरच्या निर्णयाशी निगडित असल्याचा अंदाज आहे. या निर्णयात सरन्यायाधीश गवई यांनी सनातन धर्माशी संबंधित टिप्पणी केली होती, ज्यामुळे किशोर याला राग आल्याचे सांगितले जाते. सुरक्षा रक्षकांनी तात्काळ हस्तक्षेप करून किशोरला ताब्यात घेतले, तर सरन्यायाधीश गवई यांनी या घटनेचे गांभीर्य नसल्याचे सांगत कामकाज सुरू ठेवले आणि कोणतीही कारवाई न करण्याचे निर्देश दिले. गवई यांनी गुन्हा दाखल केला पाहिजे होता. मात्र, बार कौन्सिल ऑफ इंडियाने किशोर याला प्रॅक्टिसमधून निलंबित केले आहे.ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी म्हटले, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय भूषण गवई यांच्यावर न्यायालयात हल्ला करण्याचा प्रयत्न हा भारतीय लोकशाहीवरील हल्ला आहे. हे संविधानातील लोकशाही मूल्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्याय यांच्यावर थेट प्रहार आहे. मानसिक विकृत असलेला हा किशोर नामक व्यक्ती चातुर्वर्ण व्यवस्था आणि मनुस्मृति ही संविधानाने गाडलेली परंपरा पुन्हा आणण्याचा प्रयत्न करतोय. न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि त्याच्या मंदिरात मनुवादी विचारसरणीचा हा आतंकवादी चेहरा आहे. याला वेळीच ठेचणे ही सर्व भारतीयांची प्राथमिकता आहे.सोनवणे यांनी पुढे सांगितले, या विकृत मानसिकतेच्या किशोरला सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात प्रवेश बंदी घालावी आणि त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. अशी आमची मागणी आहे. या व्यक्तीला जेथे आढळेल तेथे त्याचे तोंड काळे करून समाजाने बहिष्कृत करावे. पँथर सेनेच्या या भूमिकेने दलित आणि बहुजन समाजातून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, विविध संघटनांकडूनही या मागणीला पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे.या घटनेवर दिपक भाई केदार या नेत्यांनीही निषेध व्यक्त केला असून, देशभरात न्यायव्यवस्थेच्या सुरक्षेसंदर्भात चर्चा सुरू झाली आहे. पँथर सेनेच्या या जाहीर निषेधाने हा मुद्दा आणखी उग्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### महिला सक्षमीकरण आणि...

हक्क समजावून सांगणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

शिक्षकांना केले जागरूक–यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी शाळेतील शिक्षकांशी संवाद साधला. तुम्ही स्वतः प्रथम जागरूक झालात, तरच तुम्ही इतरांना जागरूक करू शकाल, असे समजावून सांगण्यात आले. शिक्षकांनी स्वयं–जागरूक झाल्यास ते शाळेतील विद्यार्थिनींमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये सक्षमीकरणाचे विचार प्रभावीपणे रुजवू शकतील, यावर भर देण्यात आला.

### मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय...

संघटनेचे मा. अध्यक्ष डॉ. मंगेश शिंदे आणि डॉ. संदीप माने यांच्या विचाराने आणि प्रोहस्तानातून तसेच डॉ. शैलेश इंगोले , मा. सहयोगी अधिष्ठाता मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या सोलापुर, बीड व धाराशिव जिल्ह्यांतील पुरग्रस्त भागात पशुधनाकरीता औषधोपचार , लसीकरण व पशुखाद्य वाटप करण्यासाठी मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्या वतीने पथक पाठविण्यात आले. सदर पथकाने सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील धारफळ (सीना) आणि निंबगांव , धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील शेळगाव आणि बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पोहनेर गावांमध्ये सर्वमिळून ७५० पूरग्रस्त पशुपालकांना एकूण ३८ टन पशुखाद्याचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच जनावरांचे उपचार, लसीकरण करण्यात आले. या परिस्थितीमध्ये जनावरांची काळजी घेण्यासंबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले.या पथकात डॉ. जी. एस. खांडेकर, प्राध्यापक, डॉ. संदीप कोमटवार सहयोगी प्राध्यापक, डॉ. सलिल हांडे सहयोगी प्राध्यापक, डॉ. सतीश यादव, श्री. दिपक सावरटकर डॉ पाड़े, डॉ अघाव डॉ पाथरकर आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले.

### अत्तार वेल्फेअर ट्रस्ट...

देऊन सत्कार केला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाला अत्तार वेलफेयर ट्रस्टचे सेक्रेटरी अकबर अत्तार एजाज अत्तार परवेज अत्तार मौलाना तारिक अनवर मान्यवर उपस्थित होते ज्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, नौशाद जब्बार अत्तार सारखे प्रतिभावान युवक समाजाचे खरे संपत्ती आहेत. त्यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

अत्तार वेल्फेअर ट्रस्ट अनेक वर्षांपासून शिक्षणाच्या क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे.ही संस्था विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, पालकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे यासाठी सतत प्रयत्नशील आहे.या उद्देशाने ट्रस्ट तर्फे वेळोवेळी शैक्षणिक स्पर्धा, मार्गदर्शन शिबिरे आणि गौरव सोहळे आयोजित केले जातात.कार्यक्रमाच्या शेवटी अकबर अत्तार, एजाज अत्तार, परवेज अत्तार, मौलाना तारिक अनवर , शेख मोबीन यांनी श्री. नौशाद जब्बार अत्तार यांना शुभेच्छा देत त्यांच्यावर अभिमान व्यक्त केला आणि त्यांच्या यशासाठी अल्लाह कडे प्रार्थना केली.

### एकनाथ शिंदेंचा बीड...

या उपक्रमाद्वारे पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याचे कार्य करण्यात आले. या वेळी ठाणे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले की, मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात पुढे केला आहे. मदत वाटप कार्यक्रमापूर्वी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पंचक्रोशीतील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, डोंबिवली नगरसेवक राजन मराठे, नगरसेवक अंबरनाथ सुभाष साळुंखे, डोंबिवली युवासेना अध्यक्ष सागर जेधे, उपतालुका प्रमुख राहुल गणपुले, युवासेना विधानसभा अध्यक्ष सूरज मराठे, संजय निकते आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, बीड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शामसुंदर पडुळे, शिवसेना, युवासेना, व्हीजेएनटी सेना, शेतकरी सेना व एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे शिवसेनेने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत आपले सामाजिक बांधिलकीचे धोरण अधोरेखित केले.

### महाराष्ट्र राज्य वीज...

आवाहन केले आहे. आज गुरुवार (दि.९) सकाळ पासून महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी, कृती समितीने संप सुरू केला आहे. हा संप ७२ तास सुरू राहणार आहे. यामध्ये अनेक कर्मचारी, अधिकारी सहभागी झाले आहेत. या आंदोलनाचा वीज वितरणवर कदाचित परिणाम होऊ शकतो अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बालघाटातून बुलंद आवाज वंचितकडे; वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली सतीश पायाळसह असंख्य कार्यकर्त्यांचा भव्य प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली नकनूर, कुंभारी, सोनपेठ व बाळापूर येथील असंख्य कार्यकर्त्यांसह बालघाटाचा बुलंद आवाज सतीश पायाळ यांनी वंचित बहुजन आघाडीत भव्य प्रवेश केला. सतीश पायाळ यांनी यापूर्वी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्य करत असताना समाजहिताच्या अनेक प्रश्नांवर भूमिका घेतली होती. आज ते वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, समाजहिताचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांच्या हातांना मतदानरूपी बळ देण्यासाठी आघाडीत दाखल झाले. या प्रसंगी जिल्हा महासचिव खंडू देवराव जाधव, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेशकुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, वंचित बहुजन आघाडी बीड शहर प्रमुख मिलिंद सरपते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सतीश पायाळ यांच्यासह भैय्या करडे, स्वप्नील दुनघव, तेजस चौगुले, जिवन ढोकणे, सागर निर्मळ, मयुर निर्मळ, कुणाल लांडगे, साहिल ढोकणे, रोशन धिगर, राजेंद्र वारभवन, सुधीर निर्मळ, सखाराम पायाळ, अक्षय गुळवे, नामदेव गायकवाड, विकास गंगावणे, अर्जुन धन्वे, शहादेव पायाळ, बाळू गायकवाड, बालू वारभवन, मल्हारी चक्रे, सिकंदर पायाळ, भिमराव पायाळ, मयुर ढोकणे यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करून पक्षाला बळ दिले. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी नव्याने दाखल झालेल्या सर्व



कार्यकर्त्यांचे स्वागत करताना सांगितले की, वंचित बहुजन आघाडी भाजपची बी टीम आहे असा खोटा अपप्रचार करून वंचितकडील मतदारांना वळविण्याचे षडयंत्र या ठिकाणचे प्रस्थापित पुढारी करत आहेत. वंचित बहुजन आघाडी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची खरी वारसदार आहे. समाजातील



प्रत्येक वंचित, शोषित घटकाच्या हक्कासाठी आम्ही संघर्षरत राहू. सतीश पायाळ यांचा पक्षप्रवेश हा या संघर्षाला नवे बळ देणारा ठरेल.

## सर्वोच्च न्यायालय यांना सेवेत असलेल्या शिक्षकांना टीइटी सक्तीची अट रद्द करण्याची कादरी शाहेद यांची मागणी

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

८ ऑक्टोबर २०२५: महाराष्ट्रातील हजारो प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांच्या वतीने क्रांतिकारी शिक्षक संघटनाने सर्वोच्च न्यायालयाकडे विनंती केली आहे की, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (T.E.T.) उत्तीर्ण होण्याची सक्तीची अट लागू करू नये. संघटनेने सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, १८ जून १९८३ ते २२ ऑगस्ट २०१३ दरम्यान सरकारच्या नियमांनुसार व प्रक्रियेप्रमाणे शिक्षकांची



नियुक्ती करण्यात आली होती. त्या काळात शिक्षक पात्रता परीक्षा (T.E.T.) आवश्यक नव्हती आणि या नियुक्त्या कायदेशीर व वैध मानल्या गेल्या होत्या. पत्रात म्हटले आहे की, अनेक शिक्षकांनी २० ते २५ वर्षांहून अधिक काळ निष्ठेने सेवा बजावली आहे. अशा अनुभवी शिक्षकांना आता पुन्हा T.E.T. उत्तीर्ण होण्यास भाग पाडणे अन्यायकारक, अव्यवहार्य आणि असुरक्षितता निर्माण करणारे आहे. संघटनेने स्पष्ट केले आहे की, T.E.T. ची अट नव्याने शिक्षक व्यवसायात प्रवेश घेणाऱ्यांसाठी लागू करणे योग्य आहे; परंतु दशकानुदशके सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना या परीक्षेतून सूट देणे आवश्यक आहे. अनुभव, अध्यापन कौशल्य आणि वर्गातील कामगिरी हीच शिक्षकाच्या पात्रतेची खरी मोजमापे आहेत, असे संघटनेचे म्हणणे आहे. संघटनेने १ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची आणि सर्व कार्यरत शिक्षकांना ढ.ए.ढ. मधून सूट देण्याची मागणी केली आहे. ही विनंती संघटनेचे संस्थापक सचिव कादरी शाहेद यांनी केली असून, न्यायालय शिक्षक वर्गाला योग्य न्याय देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून बीड मधील शाहूनगर गल्ली कचरा मुक्त

### मंडप, बॅनर लावून कचऱ्याची साठवणूक थांबवली

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शाहूनगर हनुमान चौका शेजारील फिनिक्स हॉस्पिटलकडे जाणाऱ्या गल्लीमध्ये कचऱ्याचे ढिगारे साचत होते न.प. कर्मचाऱ्यांनी हा कचरा उचलून नेला तरी पुन्हा तेवढाच कचरा साचत होता त्यामुळे येथील रहिवासीयांना खुप त्रास होत होता यातून त्यांची सुटका करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ गायकवाड मा. नगरसेवक, गणेश रांजवण, प्रदीप वनवे,रावसाहेबराव, संजय जाहेर पाटील, सतिश कोटुळे, झंवर, बोरा, श्रीनिवास, सहदेव आण्णा यांनी एक




नवा उपक्रम राबवला यात कचरा साठवू नये म्हणून या ठिकाणी मंडप उभारला असून, एक बॅनर ही लावले असून यामध्ये कचरा टाकणाऱ्या व्यक्तीस २००० रूपये दंड ठोठावला आहे यामुळे इथली कचरा साठवणूक पुर्णतः थांबली असून येथील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे या भन्नाट युक्तिची शहरात सर्वत्र चर्चा होत असून बीड शहरात होणारी कचरा साठवणूक रोखण्यासाठी बीड नगरपरिषद विभागाने असाच नवा उपक्रम राबवून बीड शहर कचरा मुक्त करावे अशी मागणी शहरातील नागरिक करीत आहेत...

## मिल्लीया महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा



**बीड । प्रतिनिधी**

येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस.एस. यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. ए.आर.साळुंके, राउंड ऑफिसर श्री. व्ही.पी. केदार, फॉरेस्ट गार्ड श्री. मेटे साहेब,श्री.अशोक केदार, श्री.राऊत, प्रोफेसर शेख फिरोज, प्रोफेसर काझी सलीमोद्दीन, प्रोफेसर सैरी अब्दुल्ला चाऊस यांची उपस्थित होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी पोस्टर सादरीकरण स्पर्धा तसेच वन्यजीव संवर्धनावर जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वन्यजीवांचे रक्षण आपल्या हातात या विषयावर कल्पक आणि संदेशपूर्ण चित्रे साकारली. रंगसंगती व सर्जनशीलतेच्या सुंदर मिलाफातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. झोया खानन अब्दुल खुदूस , द्वितीय क्रमांक कु.सबा फातेमा व तृतीय क्रमांक कु. शेख शिफा जलील यांनी पटकावला. प्रमुख अतिथी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.ए.आर.साळुंके यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीवांच्या संरक्षणासाठी शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व त्यात सक्रिय सहभागाचे आवाहन केले. त्यांनी वन्यजीवांच्या सुरक्षिततेवर चर्चा संवर्धन, विविध पक्ष्यांच्या प्रजाती सरपटणारे प्राणी, सस्तन प्राणी, वन कायदे, असुरक्षित प्रजाती, धोकादायक प्रजाती याबद्दल माहिती सांगितली.

# शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त 'रक्तदान शिबिर' मोठ्या उत्साहात संपन्न

### 'शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट' व 'रासेयो' चा उपक्रम

**गेवराई । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री व जय भवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित याचा ८८ वा वाढदिवसाच्या निमित्ताने 'शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट' व महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आज हे रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. शिक्षणमहर्षी आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांचा ८८ वा वाढदिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. गेवराई शहरातील 'शारदा मल्टीस्पेशशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट' व महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. श्री. जगन्नाथ काळे यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. या शिबिरामध्ये ५१ रक्त दात्यांनी रक्तदान केले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मा. श्री. श्रीहरी पवार, मा.श्री. दिपक आतकरे, आवेज शेठ, जे.के.बाबू, बंटी सौदरमल, मायकल सुतार, सुर्यकांत नवपुते, विजय सुतार, प्रशासन अधिकारी श्री. प्रमोद गोरकर, लेखापाल श्री. प्रताप हाटोटे, सह लेखापाल प्रा. काशिनाथ गोगुले, प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण, प्रा. गोपाळ धांडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण, प्रा. डॉ. संगिता आहेर यांच्या सह सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भूस्खलन ग्रस्त कपिलधार वाडी व पूरग्रस्त शिवणी गावातील विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री क्षेत्र कपिलधार येथील वाडी वर भूस्खलन झाल्यामुळे जमीन खचली रस्त्यावर ५ फूट ते ८ फूट भेगा पडल्या घरांच्या , शाळेच्या भिंती ला तडे गेले, तर काही घर ढासळली अश्या तसेच या वर्षी प्रचंड पाऊस अतिवृष्टी मुळे शेतकरी यांचे शेतातील उत्पन्न सह जमीन वाहून गेल्या मुळे, प्रचंड नुकसान झाले, अश्या वेळी मनाने खचून गेलेले शेतकरी बांधव यांना फुल न फुलाची पाखळी मनून बीड तालुक्यातील शिवणी या गावातील विद्यार्थी यांना पण सर्व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, हा सामाजिक उपक्रम आदित्य दहिवाळ, विनोद चव्हाण, व मित्र परिवार यांच्या वतीने घेण्यात आला, कपिल धार वाडी ची पाहणी करून दोन्ही गावातील अंगणवाडी ते इय्यता १ ली ते १० वी पर्यंत च्या सर्व विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य मध्ये



बॅग, पाणी बॉटल, प्रत्येकी लहान विद्यार्थी ना ४ व मोठ्या विद्यार्थी ना ५ वह्या, कॉम्पॉस, जेवणाचा डब्बा, सह सर्व शालेय किट देण्यात आली, तसेच असे आणखी उपक्रम इतर पूरग्रस्त गावात पण घेण्यात येणार आहेत असे या वेळी आदित्य दहिवाळ व विनोद चव्हाण यांनी बोलताना मनाले, हा उपक्रम सामाजिक बांधिलकी मनून पिचलेला खचलेला शेतकरी बांधव यांच्या मुलं - मुलीं ना शैक्षणिक आधार नक्कीच होईल, व इतरांनी पण असे उपक्रम ज्या गावातील विद्यार्थी यांना मदत पोहचली नाही त्यांना पण आप आपल्या परीने मदत नव्हे कर्तव्य मनून असे उपक्रम घ्यावेत असे आवाहन करण्यात आले, या वेळी आदित्य दहिवाळ, विनोद चव्हाण, रमेश चौरे, बालाजी बेद्रे, विजय सुपेकर, विजय कुटे, भैय्या कुटे, सोमनाथ घोडके, नाना स्वामी सह शिक्षक शिक्षिका व गावकरी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पूरग्रस्त पाच गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप

### सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हा छोटासा प्रयत्न : एस. एम. देशमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती नेस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने गरजूना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे



विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने आणि तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अनेकांची पिके नेस्तनाबूत झाली. अनेकांची घरे पडली.सांडस चिंचोली सारख्या गावांमध्ये तर संपूर्ण गावाला पाण्याचा वेढा पडला होता. अशा परिस्थितीत लोकांचा संपर्क तुटल्याने लोकांना वाचवणे हा मोठा प्रश्न होता. अनेकांना एनडीआरएफ च्या पथकाने बाहेर काढले. तशीच परिस्थिती देपेगाव,सांडस चिंचोलीची होती. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाणी घुसले आता परिस्थिती पूर्व पदावर येत असून शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना धान्यापासून ते वस्तू पर्यंत सर्वच गोष्टीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, डेपेगाव, मंजरथ ,सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला या गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप करून काही प्रमाणात का होईना पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है, शिवसेनेचा विजय असो, शेतकऱ्यांनची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, सरसकट मदत झालीच पाहिजे , एकरी ५०,००० रु. मदत मिळालीच पाहिजे अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिकांनी दिल्या यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव, जिल्हाप्रमुख



गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी संपर्क प्रमुख व जिल्हाप्रमुखांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार यापुढेही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले , उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नितीन भैय्या धांडे,संजय महाद्वार, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख महादेव परसकर,तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे ,तालुका सहसचिव संदिप भानप, कामगार नेते रविअणणा वाघमारे,माजी प.स. सदस्य नवनाथ प्रभाळे , विनोद गुंड पाटील, मच्छिंद्र सावंत,सर्कलप्रमुख रमेश नवले, उपसरपंच बाळासाहेब कुटे , मनिष कुटे ,आदेश कुटे ,रामू पैठणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा विद्यार्थी इकबाल मुक्तार शेख याला अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०८/१०/२०२५ खुलताबाद येथील चिस्तिया महाविद्यालयात संपन्न झालेल्या अंतरमहाविद्यालयीन पुरुष बॉक्सिंग स्पर्धेत श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीडचा खेळाडू इकबाल मुक्तार शेख याने उल्लेखनीय कामगिरी करत ६५ किलो वजन गटात रौप्यपदक (सिल्वर मेडल) पटकावले आहे.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे यांनी इकबालचे मनःपूर्वक अभिनंदन केले



असून त्याला आगामी स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागानेही या यशाचे कौतुक करत, इकबालच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे विशेष कौतुक केले आहे. या कामगिरीमुळे श्री बंकटस्वामी महाविद्यालयाने पुन्हा एकदा क्रीडा क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

दै.बीड सुपरफास्ट www.beedsuperfast.com

शनिवार दि. ११ ऑक्टोबर, २०२५ पान ४



गेवराई : गोदावरी नदीला अचानक आलेल्या महापुरामुळे मासेमारी करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई मिळण्यासाठी गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांना निवेदन देण्यात आले यावेळी सरपंच अशोक सुखदेव, नारायण सुखदेव, ज्ञानेश्वर सुखदेव, ईश्वर सुखदेव, भारत सुखदेव, गणेश सुखदेव दिसत आहेत.

# औरंगाबाद येथील हंबरडा मोर्चासाठी बीड जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने उपस्थित रहा-परशुराम जाधव

### संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचा बीड जिल्ह्यात झंजावती दौरा-नितीन धांडे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या उपस्थितीत व शिवसेना नेते विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दादा दानवे साहेब यांच्या नियोजनाखाली छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ शनिवार रोजी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये शासनाने मदत द्यावी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी द्यावी विविध मागण्या संदर्भात भव्य असा हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे सदरील मोर्चा मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उपोषणा वाचा फोडण्याकरता आयोजित केला आहे व या मोर्चाला बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त शिवसैनिक व शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे करिता शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे,उपजिल्हाप्रमुख रामराजे साळुंखे,तालुकाप्रमुख विनायक बाप्पा मुळे,तालुकाप्रमुख बाबा सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आडवा बैठकी संपन्न झाल्या यावेळी वडवणी,माजलगाव,धारूर प्रत्येक तालुक्यात जाऊन तालुका निहायक आढावा घेऊन जोरदार नियोजन करीत आहेत मुंबईचा शिवसैनिक कसा असावा याचे जिवंत उदाहरण संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब करत आहेत पंधरा दिवसांपूर्वी मोठ्या मुलाचे निधन झाले असताना तरीपण पक्षप्रमुख माननीय उद्धव ठाकरे साहेब शेतकऱ्यांच्या प्रश्नाकरिता रस्त्यावर उतरत आहे हे समजल्यावर आपले दुःख बाजूला ठेवून मैदानात उतरले व पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन जास्तीत जास्त शिवसैनिक संभाजीनगरला येतील व हंबरडा मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन करीत आहेत, माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे, संजय धपाटे, लक्ष्मण साळुंखे, बंडू सावंत,संजय शिंदे, सुनील भामरे, विष्णुपंत टकले,उद्धव काकडे,काटकर सर,अविनाश बेदरे,दिनकर गोंडे,



# अत्तार वेल्फेअर ट्रस्ट तर्फे नौशाद जब्बार अत्तार यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

नौशाद जब्बार अत्तार यांनी आपल्या मेहनत, चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालय येथे चझडउ मार्फत लिपिक पदावर निवड प्राप्त केली आहे.

या यशाबद्दल अत्तार वेल्फेअर ट्रस्ट च्या पदाधिकारी आणि सदस्यांनी त्यांचा फुलांचा गुच्छ पेन व शाल » पान २ वर

# मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय व माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने पूरग्रस्त भागातील गरजूंना मदत करून सहकार्य



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय व मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना व विद्यार्थी परिषद याच्या संयुक्त विद्यमाने सोलापुर, बीड व धाराशिव जिल्ह्यातील पुरग्रस्त क्षेत्रात पशुधनाकरीता औषधोपचार , लसीकरण व पशुखाद्य वाटप करण्यात आले गरजूना मार्गदर्शन हि करण्यात आले.

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय व मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना व विद्यार्थी परिषद याच्या संयुक्त विद्यमाने सोलापुर, बीड व धाराशिव जिल्ह्यातील पुरग्रस्त क्षेत्रात पशुधनाकरीता औषधोपचार , लसीकरण व पशुखाद्य वाटपाकरिता महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात व मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय माजी विद्यार्थी » पान २ वर

# लाडक्या बहिणीचे सप्टेंबर महिन्याचे पंधराशे लवकरच खात्यात

**पात्रुड । प्रतिनिधी**

राज्यातील लाडक्या बहिणीसाठी गुड न्यूज आहे सप्टेंबर महिन्याचे १५०० रुपये लवकरच मिळण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिन्याचा हप्ता सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला मिळाला होता त्यामुळे आत्ता लवकरच सप्टेंबर महिन्याचा हप्ता मिळण्याची शक्यता आहे दिवाळीचा सण जवळ असल्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे सप्टेंबर महिन्याची प्रतीक्षा महिलांना आहे. राज्य सरकारकडून लाडक्या बहिणींना सप्टेंबर महिन्याचे हप्त्याची रक्कम देण्यात येणार आहे या योजनेसाठी ४१० कोटी वर्ग करण्यासंदर्भात राज्य सरकाराकडून सामाजिक न्यायविभागाकडून जारी करण्यात आले आहे. सप्टेंबर महिन्याचे हप्त्याचे वितरणसाठी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून महिला व बालविकास विभागाकडे ४१० कोटी रुपये वर्ग केले आहेत.

# घरकुल कर्मचाऱ्यां विरोधात पंचायत समिती समोर अखंड हरिनाम सप्ताह



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा पंचायत समिती येथील घरकुल विभागाचे कर्मचारी बेकायदेशीररित्या घरकुलांचे हप्ते देत आहेत. परंतु ज्यांची घरकुल बांधून पूर्ण झाली आहेत त्यांना बेसमेंटचे फोटो दाखवा मला का नाही सांगितले अशी कारणे देवून त्यांना घरकुलांचे बिलापासून जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहे. या कारणांमुळे चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह आंदोलन करण्यात येत आहे. मौजे चुबळी या गावात अनेक ग्रामस्थांना घरकुल मंजूर होऊन बेसमेट काम करुन सुध्दा बील काढले जात नाही आणि जे घरकुलांचे हप्ते सोडले आहेत त्यांचे कोणाचेही बेसमेट जिओटकचे फोटो आपले कार्यालयकडे नाहीत तसेच ते संपुर्ण आपले कार्यालयाणे जाणीवपूर्वक काही कर्मचारी यांना चुंबळी येथील घरकुलांचे हप्ते देवू नका असे कळविले समजते. पुढे आंदोलकाने निवेदनामध्ये नमूद केले आहे की आमचे त्वरीत चुंबळी येथील सर्व घरकुलांचे दुसऱ्या हप्त्याचे वितरण करावे व दोषी कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे निलंबन करण्यासाठी आज गुरुवार दि. ९ आक्टोंबर २०२५ रोजी चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात गोरख झेंड, अविनाश नागरगोजे, नरहरी पवळ, भरत नागरगोजे,दत्तु पवळ, दिनकर नागरगोजे, का. महादेव नागरगोजे, मोहन पवळ, महादेव नागरगोजे, शिवाजी पव्हणे, विशाल मळेकर, सतिश सिरसाठ, सह आदी उपस्थित होते.



**गेवराई शहरातील उपविभागीय कार्यालय (पोलीस) येथील कार्यभार हस्तांतरित केलेले मा.श्री अनिल जी कटके यांचे बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अनिल बोर्डे यथोचित स्वागत करून पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या व मान्यवर यांनी ज्येष्ठ नागरिक यांना बहुमोल मार्गदर्शन केले आहे.**

# एकनाथ शिंदेंचा बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात; शेकडो शेतकऱ्यांना मदत किटचे वाटप!

### मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण : राजेश कदम



**बीड । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भीषण परिस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरणा मानत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला. शिवसेना कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सिंदफना नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील शेतकऱ्यांना मदत कीट वाटप करण्यात आले. » पान २ वर

# रिपाइंच्या संभाजी गायकवाड यांची भटके-विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**



रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून अनेक वर्षांपासून चळवळीत काम करणारे बीड शहरातील बलभिम नगर पेठ बीड येथील संभाजी मारोती गायकवाड यांची दि.९ ऑक्टोबर २०२५ रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत यांची भटके-विमुक्त आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडी प्रसंगी नवनिर्वाचित भटके-विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड म्हणाले की, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे हात बळकट करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील गाव-गावामध्ये भटके-विमुक्त समाजातील युवकांचे संघटन करून मजबूत पक्ष बांधणीचे काम आगामी काळात इमाने इतबारे करणार आहे. या निवडी प्रसंगी राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, नागेश आण्णा दुबळे, अक्षय कोकाटे, के. के. कांबळे, रतन वाघमारे, पप्पू वाघमारे, सन्नी जोगदंड, अमोल मिटकर, लखन जाधव, विजय डोळस, अभिषेक जोजारे, रोहित गायकवाड, करण वाघमारे, अशोक भाले, राम पवार, तुषार गायकवाड, साईनाथ जाधव, रोहित डोंगरे, कृष्णा वैष्णव, आकाश वाघमारे, आरशान शेख, विशाल माने, रितेश गुंजाळ ओमकार गायकवाड, ए. एच. गायकवाड, परसराम जाधव, महेश काळे, आदी उपस्थित होते.

# सोमवारी ह.भ.प. सौ सुषमा कुलकर्णी यांची प्रवचन सेवा

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक १३/१०/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत सौ सुषमा कुलकर्णी यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# महिला सक्षमीकरण आणि जनजागृती कार्यक्रमाला बीडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद!

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला पदाधिकाऱ्यांनी एम एस इंग्लिश स्कूल, बीड येथे आयोजित केलेल्या महिला सक्षमीकरण आणि जनजागृती कार्यक्रमाला मोठे यश मिळाले आहे. अनेक महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला होता.

नेतृत्व आणि उपक्रमाचा उद्देश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश अध्यक्षा



रुपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा अध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे, नुझत सिद्दीकी, यास्मीन शेख, आणि हेड कॉन्स्टेबल शोभा जाधव मॅडम यांनी सक्रिय सहभाग घेत कार्यक्रमाची यशस्वी आखणी केली.

आजही अनेक स्त्रिया आर्थिक किंवा इतर कारणांमुळे स्वतःला सक्षम समजत नाहीत आणि त्यामुळे घाबरून आपले जीवन जगतात. अशा महिलांना त्यांचे सामर्थ्य आणि » पान २ वर

### सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवईवर हल्ला

# ऑल इंडिया पँथर सेनेचा तीव्र निषेध

### हल्लेखोराला देशद्रोही घोषित करा- नितीन सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश माननीय भूषण रामकृष्ण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाने देशभरात खळबळ उडाली असताना, ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला आहे. सेनेचे प्रमुख नितीन सोनवणे यांनी हल्लेखोर वकील राकेश किशोर याला 'देशद्रोही' घोषित करत, त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



ही घटना भारतीय लोकशाही आणि संविधानाच्या मूलभूत मूल्यांवर हल्ला असल्याचे म्हणत, सोनवणे यांनी मनुवादी विचारसरणीचा 'आतंकवादी चेहरा' असलेल्या या व्यक्तीला ठेचण्याची गरज असल्याचे सांगितले.सर्वोच्च न्यायालयात सोमवारी (६ ऑक्टोबर) घडलेल्या या घटनेत, वकील राकेश किशोर या व्यक्तीने सरन्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. मिळालेल्या माहितीनुसार, ही कृत्य खजुराहो येथील जावरी (वामन) मंदिरातील भगवान विष्णूच्या » पान २ वर

**दैनिक बीड सुपरफास्ट** हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक **अतुल शंकरराव जाधव** यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स अॅण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ ( महाराष्ट्र राज्य) येथून छापून, **दैनिक बीड सुपरफास्ट** कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका : अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. **संपादक : अतुल शंकरराव जाधव**

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE : NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN - 431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV